o/c

Exh 8/D

**कोर्ट विद्यमान मा. डी. डी. विघ्ने दिवाणी न्यायाधीश क.स्तर कारंजा (घा)**
**ता. कारंजा (घा) जि.वर्धा**

**जाहिरनामा**

**वारसदाराचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**अर्जदार** :— रामदास बेलखडे अधिक ६

**वि.**

**गैरअर्जदार** :— निरंक

**एम.जे.सी.क्र. २८/२०२६**
पेशी तारीख : ०८/०९/२०२६
प्रोसेस क्रमांक 852/26 to 854/26
दिनांक 4.8.26

ज्याअर्थी राजू बाळकृष्ण बेलखडे यांनी दिवाणी न्यायालय क. स्तर कारंजा घाडगे या न्यायालयात मयत बाळकृष्ण बारकू बेलखडे, यांचा मृत्यु दिनांक २०/०१/२००६, रोजी व मयत चंद्रभागा बाळकृष्ण बेलखडे यांचा मृत्यु दिनांक १०/०३/२०२६ रोजी झाला. तसेच सुरेश बारकू बेलखडे यांचा मृत्यु दिनांक १५/०९/२०१३ रोजी झाला त्याअर्थी त्यांचे वारसदार म्हणून **अर्जदार क्र. १.** रामदास बाळकृष्ण बेलखडे, वय — ५९ वर्ष, धंदा — मजूरी, **अर्जदार क्र. २.** धनराज बाळकृष्ण बेलखडे**,** वय —५५ वर्ष, धंदा — मजूरी, **अर्जदार क्र. ३.** राजू बाळकृष्ण बेलखडे, वय — ५२ वर्षे, धंदा — मजूरी, अर्जदार क्र. १ ते ३ रा.कारंजा घा. ता. कारंजा घा. जि. वर्धा, **अर्जदार क्र. ४.** शोभा उकंडराव आष्टनकर, वय — ६३ वर्ष, धंदा — घरकाम, रा. कोंढाळी, ता. काटोल, जि. नागपूर, **अर्जदार क्र. ५.** सविता सुरेश बेलखडे, वय — ४६ वर्ष, धंदा — मजूरी, **अर्जदार क्र. ६.** स्वप्नील सुरेश बेलखडे, वय— २७ वर्षे, धंदा — शिक्षण, **अर्जदार क्र. ७.** रितेश सुरेश बेलखडे, वय — २६ वर्ष, धंदा — शिक्षण, अर्जदार क्र. ५ ते ७ रा. कारंजा घा. ता. कारंजा घा. जि. वर्धा, विरुद्ध निरंक यांनी या न्यायालयात सदरहू मयताचे वारसानाचे प्रमाणपत्र मिळावे (Legal Heirship Certificate) असा अर्ज दाखल केला आहे.

मयत बाळकृष्ण बारकू बेलखडे व चंद्रभागा बाळकृष्ण बेलखडे, तसेच सुरेश बारकू बेलखडे यांच्या मृत्यूनंतर अर्जदारांना मयताचे कायदेशिर वारस म्हणून घोषित करण्यासाठी अर्जदार यांनी वारसान प्रमाणपत्र मिळावे याकरिता सदरचा अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार मयताचे वारसान नव्हे असे कोणास सांगावयाचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने दिवाणी न्यायाधीश क. स्तर कारंजा घाडगे जिल्हा वर्धा हया न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय अर्जदार हयांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास अर्जदारांना वारसानाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

करीता आज ०४ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

तयार करणार
(सही)
सुट शिरस्तेदार

(शिक्का: दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) ... (घाडगे))

आदेशानुसार
(सही) 04/08/26
प्र. सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, कारंजा घा.
सहायक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,कारंजा घा.

**प्रतिलीपी** —: १)मा. संपादक, दैनिक विदर्भ मतदार वृत्तपत्र, कार्यालय, वर्धा.
२)कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर कारंजा घाडगे यांचे नोटीसबोर्डवर.
३)तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय कारंजा घाडगे यांचे नोटीसबोर्डवर.
४)नगरपंचायत कार्यालय कारंजा घा. जि. वर्धा यांचे नोटीसबोर्डवर.

**नोट** :— जाहीरात हि ठळक अक्षरात किंवा वाचता येईल अशी प्रसिध्द करणे.

(2) आज दि 19/8/26 रोजी मा. दिवाणी न्यायालय क. स्तर कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची 1 एक प्रत लावून प्रसिध्द केली

(signature)
आवक/जावक लिपिक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
कारंजा (घाडगे)

(3) आज दि 19/8/26 रोजी तहसिल कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची 1 एक प्रत लावून प्रसिध्द केली

(stamp: तहसिलदार कारंजा (घा.))
(signature) 19/8/26

(4) आज दि 19/8/26 रोजी नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर जाहिरनाम्याची 1 एक प्रत लावून प्रसिध्द केली.

## बेलीफ रिपोर्ट

आदेशानुसार मौजा कारंजा (घा) येथे दि 19/8/26 रोजी जाहिरनाम्यात दिलेल्या कार्यालयीन पत्यावर जावून जाहिरनाम्याचे प्रतिलीपी न 2 ची 1 एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क. स्तर कारंजा (घा) यांचा नोटीस बोर्डावर लावली व प्रतिलीपी नं 3 ची 1 एक प्रत तहसिल कार्यालय कारंजा (घा) तसेच प्रतिलीपी न 4 ची 1 एक प्रत नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर लावून कार्यालयाच्या संबंधीत आजा लिपिकांची स्वाक्षरी व शिक्का घेवून जाहिरनामे प्रसिध्द करण्यात आले.

(stamp: कार्यालय नगर पंचायत कारंजा जि. वर्धा)
प्राप्त
(signature)

अ. कृ. इंडरकर
दि 19/8/26
(बेलीफ)

## शेरा

सदर जाहिरनाम्याची प्रतिलीपी न 2 ची 1 एक प्रत मा. दिवाणी न्यायालय क. स्तर कारंजा (घा) व प्रतिलीपी न 3 ची 1 एक प्रत तहसिल कार्यालय कारंजा (घा) तसेच प्रतिलीपी न 4 ची 1 एक प्रत नगर पंचायत कार्यालय कारंजा (घा) यांच्या नोटीस बोर्डावर लावून जाहिरनामे प्रसिध्द करण्यात आले

(signature) Bagde
20.8.26
For clerk

## प्रतिज्ञालेख

माझ्या समक्ष श्री अ. कृ. इंडरकर बेलीफ यांनी प्रतिज्ञालेख वर खरे सांगितले

(signature) 20/8/26
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, कारंजा (घा.)